| वर्ष - 7 । अंक - 185 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



www.mahaenews.com । रविवार, दिनांक 12 नोव्हेंबर 2023 पिंपरी-चिंचवड आवृत्ती mahaenews.com maha_enews Mahaenews

# शरद पवारांची प्रकृती बिघडली!

## » डॉक्टरांचा विश्रांतीचा सल्ला : पुरंदर-पुणे दौरा केला रद्द

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना बारामतीतील एका संस्थेच्या बैठकीदरम्यान अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांची तात्काळ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली आहे. तपासणीनंतर डॉक्टरांनी पवार यांना विश्रांतीचा सल्ला दिला आहे.**



येथील विद्या प्रतिष्ठानच्या बैठकीसाठी पवार आले होते. यावेळी त्यांना अचानक त्रास जाणवू लागल्याने त्यांची डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली.

तपासणीनंतर डॉक्टरांनी पवार यांना विश्रांतीचा सल्ला दिला आहे. काल रात्रीपासूनच शरद पवार बारामतीच्या दौऱ्यावर आहे. दिवाळीनिमित्त दरवर्षी शरद पवार यांच्यासह पवार कुटुंबीय बारामतीत असतात.

सकाळी ते दहा वाजताच्या सुमारास गोविंद बाग या आपल्या निवासस्थानातून एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट येथे बैठकीसाठी गेले होते.

त्यानंतर दुपारी चार वाजता विद्या प्रतिष्ठान या संस्थेच्या बैठकीसाठी शरद पवार विद्या प्रतिष्ठान येथे गेले असताना अचानक त्यांना अस्वस्थ वाटू लागले. याबाबत त्यांनी त्यांची कन्या खासदार सुप्रिया सुळे यांना सांगितले.

### विश्रांती न घेतल्याने थकवा...

**» खासदार सुळे यांनी तात्काळ हृदयरोग तज्ञ डॉ. रमेश भोईटे, डॉ. सनी शिंदे यांना बोलावून घेत पवार यांची तपासणी केली. डॉक्टरांनी पवार यांचा एसीजी काढला. सततच्या कार्यक्रमांमुळे व विश्रांती न घेतल्यामुळे पवार यांना थकवा आल्याचे डॉक्टरांनी तपासणीनंतर सांगितले. डॉक्टरांनी पवार यांना विश्रांतीचा सल्ला दिला आहे. त्यामुळे पवार यांचा उद्याचा पुरंदर दौऱ्यातील कार्यक्रम रद्द करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.**

# पिंपरी, चिंचवड, निगडीमध्ये दीड तास वीज खंडित

## » अतिउच्चदाब वीजवाहिनीत बिघाड : नागरिक, व्यापाऱ्यांची नाराजी

। पुणे ।महाईन्यूज ।

**अदानी कंपनीच्या अतिउच्चदाब ४०० केव्ही शिक्रापूर ते तळेगावच्या एका वीजवाहिनीमध्ये शनिवारी (११ नोव्हेंबर) पहाटे चाऱ्याच्या सुमारास अचानक तांत्रिक बिघाड झाला होता. सुमारे २०९ मेगावॅट विजेची तूट निर्माण झाली होती. त्यामुळे महापारेषण आणि महावितरणच्या उपकेंद्रांमधून भारव्यवस्थापन शक्य नसल्याने सकाळी सव्वासात ते सकाळी पावणेनऊ वाजेपर्यंत पिंपरी चिंचवड शहरातील काही भाग तसेच खराडी, चंदननगर, मावळचा काही परिसर, उरूळीकांचन या ठिकाणी नाईलाजाने विजेचे भारनियमन करावे लागले.**

अदानी कंपनीच्या अतिउच्चदाब ४०० केव्ही वीजवाहिनीमध्ये बिघाड झाल्यामुळे भारव्यवस्थापनासाठी एलटीएस (लोड ट्रिमिंग स्कीम) यंत्रणा कार्यान्वित झाली.

सुमारे २०९ मेगावॅटची तूट भरून काढण्यासाठी महापारेषणाचे १३२ केव्ही रहाटणी, २२० केव्ही चिंचवड, २२० केव्ही थेऊर, १३२ केव्ही यव आणि २२० केव्ही उर्से अतिउच्चदाब उपकेंद्रांचा वीजपुरवठा बंद करण्यात आला.



### 2 लाख 19 हजार ग्राहकांना फटका...

**» परिणामी, महावितरणच्या उपकेंद्रांना देखील वीजपुरवठा बंद झाला. त्यामुळे पिंपरी, चिंचवड, पिंपळे सौदागर, काळेवस्ती, थेरगाव, वाकड, निगडी, प्राधिकरण, किवळे, खराडी, चंदननगर, मावळमधील काही भाग, उरुळी कांचन शहर, कुंजीरवाडी, थेऊर, शिंदेवाडी अष्टापूर, हिंगणगाव, खामगाव टेक, टिळेकरवाडी या गावांतील सुमारे २ लाख १९ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा सकाळी दीड तास बंद ठेवावा लागला.**

# वारकऱ्यांचं श्रद्धास्थान असणारी इंद्रायणी नदी पुन्हा फेसाळली

। आळंदी ।महाईन्यूज ।

पुण्यातील देवाच्या आळंदीतून वाहणारी अन् वारकरी सांप्रदायाचं श्रध्दास्थान असलेली इंद्रायणी नदी पुन्हा एकदा फेसाळली आहे. अक्षरशः नदीतून पाणी वाहतंय की साबणाचा फेस वाहतोय असा प्रश्न वारकरी आणि ग्रामस्थांना पडला आहे.

पिंपरी चिंचवडमधील कंपन्यांचे हे पाप असल्याचं वेळोवेळी उघड झाल आहे. त्या कंपन्या रसायनयुक्त पाणी नदीत सोडून वारकरी आणि ग्रामस्थांच्या जीवाशी खेळत आलेत. आषाढी वारी, कार्तिकी एकादशी, संजीवनी समाधी सोहळ्यासाठी येणारा वारकरी इंद्रायणी नदीत स्नान करतो. हेच पाणी तीर्थ म्हणूनही पितो. त्यामुळं त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी वेळोवेळी इंद्रायणी नदीला मोकळा श्वास मिळवून देण्याची भाषा केली आहे. अगदी या कंपन्यांवर गुन्हे ही दाखल केले गेले आहेत. पण परिस्थिती आज ही जैसे थेच आहे. गेली सात वर्षे यासाठी वारकरी आणि ग्रामस्थांनी लढा उभारला आहे, पण त्यांच्या पदरी आज ही निराशा कायम आहे.

# 'दिवाळी मेला'ला उत्स्फूर्त प्रतिसाद!

## गायत्री स्कूलचा उपक्रम : विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराचे धडे

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शालेय जीवनातच विद्यार्थ्यांना स्वंयरोजगार आणि व्यवहार ज्ञान प्राप्त व्हावे. या उद्देशाने गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलने दिवाळीनिमित्त 'दिवाळी मेला' उपक्रमाला विद्यार्थी आणि पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**





स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे (एसव्हीएसपीएम) संस्थापक व अध्यक्ष विनायक भोंगाळे यांच्या संकल्पनेतून भोसरी येथील गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास व्हावा. तसेच, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा. या करिता विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यावर्षी दिवाळीनिमित्त विद्यार्थ्यांना पणती बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांनी बनवलेल्या पणत्यांचे प्रदर्शन भरवण्यात आले. या प्रदर्शनाला पालकांना निमंत्रित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना स्वत: बनवलेल्या वस्तुंची विक्री करण्याची संधी देण्यात आली. या प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेच्या विश्वस्त सारिका विखे-पाटील यांच्याहस्ते करण्यात आले. पालकांनी 'दिवाळी मेला' मध्ये खरेदीचा आनंद लुटला. विशेष म्हणजे, पालकांनी या उपक्रमाचे आणि विद्यार्थ्यांच्या कलाकौशल्याचे कौतूक केले. स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक कविता कड्‌- पाटील, सचिव संजय भोंगाळे यांनीही प्रदर्शनाला भेट दिली.

> विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा विकास व्हावा. यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. त्यामुळे अभ्यासक्रमासोबतच व्यवहारीक जीवनात आवश्यक असलेले ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे. या करिता विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. दिवाळीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी स्वत: पणती बनवल्या आणि त्यांची विक्री केली. हा उपक्रम छोटेखानी असला तरी व्यवहारिक जीवनात मार्गदर्शक ठरणारा आहे. सर्व विद्यार्थी आणि त्यांना साथ देणाऱ्या पालकांचेही यानिमित्ताने कौतूक केले पाहिजे.
>
> **- विनायक भोंगाळे,** संस्थापक अध्यक्ष, एसव्हीएसपीएम.

# पिंपरी-चिंचवडमध्ये महाराष्ट्र केसरी निवड चाचणी!

## आंतरराष्ट्रीय कुस्ती संकूल येथे आज होणार सामने

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने धाराशिव येथे होत असलेली ६५ वी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा आणि पिंपरी चिंचवड चाचणी निवड कुस्ती स्पर्धा आज होणार आहे. भोसरीतील पै. मारुती रावजी लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती संकूल येथे सकाळी १० वाजता ही स्पर्धा होणार असून, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद निरीक्षक मारुती आडकर, रायगड, सुभाष ढोणे ठाणे, गाढवे सर मुंबई याच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड चाचणी निवड कुस्ती स्पर्धा घेण्यात येणार आहे.**




महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा 2023-२४ निवड चाचणीसाठी पै. बाळासाहेब रामचंद्र लांडगे (वस्ताद) यांच्या ६९ वा वाढदिवसानिमित्ताने पिंपरी-चिंचवड शहर निवड चाचणी कुस्ती स्पर्धा होणार आहे, अशी माहिती संयोजक पै नितीन बाळासाहेब लांडगे यांनी दिली. महेशदादा स्पोर्टस फाऊंडेशन, भवानी तालीम यांनी नियोजनामध्ये पुढाकार घेतला आहे.

# अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांची उचलबांगडी!

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**ससून सर्वोपचार रुग्णालयातील कैदी पलायन प्रकरणात अधिष्ठाता डॉ.संजीव ठाकूर आणि अस्थिव्यंगोपचार विभागातील पथकप्रमुख डॉ.प्रवीण देवकाते यांच्यासह इतर अधिकारी दोषी आढळले आहेत. या प्रकरणी राज्य सरकारने डॉ.ठाकूर यांना पदमुक्त केले असून, डॉ.देवकाते यांना निलंबित केले आहे.**




### काय घडलं 22 सेकंदात?

» अंतिम फेरीची लढत सुरु झाली. शिवराज राक्षे आणि सिकंदर शेख यांनी एकमेकांना आव्हान देण्यास सुरुवात केली. सुरुवात झाल्यापासूनच सिकंदर आक्रमक वेगाने खेळत होता. सिकंदरच्या वेगापुढे शिवराजचा निभाव लागला नाही. कारण २२ व्या सेकंदाला सिकंदरने झोळी डाव घेत शिवराजला धोबीपछाड केलं. चितपट करुन विजय मिळवला. कुस्तीचे हे २२ सेकंद उपस्थितांच्या डोळ्यांचं पारणं फेडणारे ठरले.

ससून रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने पलायन केल्याप्रकरणी राज्य सरकारने चार जणांची चौकशी समिती ११ ऑक्टोबरला नियुक्त केली होती. या समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर होते. ही समिती १५ दिवसांत चौकशी करून सरकारला अहवाल सादर करणार होती. समितीचे अध्यक्ष डॉ. म्हैसेकर यांनी १५ दिवस संपताच तातडीने २७ ऑक्टोबरला चौकशी अहवाल वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांना सादर केला होता. हा अहवाल निवतकर यांच्याकडून वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव दिनेश वाघमारे यांच्याकडे पाठवला जाणार होता.

वाघमारे हे परदेश दौऱ्यावर होते. ते परतल्यानंतर ३ नोव्हेंबरला हा अहवाल त्यांच्यासमोर सादर करण्यात आला. नंतर वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ हे दौऱ्यावर होते. ते दौऱ्यावरून परतल्यानंतर त्यांच्याकडे अखेर ८ नोव्हेंबरला अहवाल सादर करण्यात आला. त्यानंतर शुक्रवारी राज्य सरकारने ससूनचे अधिष्ठाता डॉ.ठाकूर यांना पदमुक्त केले तर डॉ.देवकाते यांचे निलंबन केले.

# दिवाळी फराळाच्या निमित्ताने

# सर्वपक्षीय नेत्यांची गप्पांची मैफल!

## » दिशा सोशल फाऊंडेशनच्या दिवाळी फराळाचे आयोजन



। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिशा सोशल फाऊंडेशनच्या वतीने यंदा आठव्या वर्षी दिवाळी फराळाचे आयोजन करण्यात आले. काळेवाडी येथील आरंभ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात अभिनेते प्रवीण तरडे यांच्या वाढदिवसानिमित्त माजी मंत्री बाळा भेगडे आणि आमदार अण्णा बनसोडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.**

खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार अमर साबळे, माजी मंत्री बाळा भेगडे, आमदार अण्णा बनसोडे, माजी आमदार दिपक पायगुडे, अभिनेते प्रविण तरडे, देवदत्त नागे, पिंपरी प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, वनराईचे अध्यक्ष रवींद्र धारिया, राज्य नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, काँग्रेसचे शहराध्यक्ष कैलास कदम, मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले तसेच माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे, वसंत लोंढे, सचिन साठे, राहुल कलाटे, योगेश बाबर, माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, माजी नगरसेवक राजू मिसाळ, जगदीश शेट्टी, सुरेश भोईर आदींनी हजेरी लावली.

यावेळी आयर्नमॅन स्वप्निल चिंचवडे, शूटिंग स्पर्धेत सुवर्णपदक विजेती आर्या म्हस्के यांना दिशागौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. जवळपास तीन तास चाललेल्या या कार्यक्रमात विविध विषयांवर चर्चा झाली. दिशा सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष जगन्नाथ उर्फ नाना शिवले, उपाध्यक्ष संतोष बाबर, कार्याध्यक्ष राजेंद्र करपे, सचिव संतोष निंबाळकर, खजिनदार नंदकुमार कांबळे, माजी अध्यक्ष गोरख भालेकर, माजी कार्याध्यक्ष सचिन साठे आदींसह दिशा सोशल फाऊंडेशनच्या सदस्यांनी संयोजन केले.

### कोण काय म्हणाले?

» **प्रवीण तरडे :** सार्वजनिक जीवनाच्या विविध क्षेत्रातील मान्यवरांना एकाच व्यासपीठावर आणून सांस्कृतिक विचारांची दिवाळी साजरी करण्याचा अनोखा उपक्रम दिशाने सातत्याने राबविला आहे. मी ही या संस्थेचा एक भाग आहे, याचा मला अभिमान वाटतो.

**देवदत्त नागे :** दिवाळीचा सण हा प्रकाशाचा उत्सव आहे. स्नेह, आपुलकी आणि एकात्मता जपणारा उत्सव आहे. दिवाळी फराळाच्या निमित्ताने आपल्यातील स्नेह आणि आपुलकी अधिक वाढावी म्हणून अशा प्रकारचे कार्यक्रम प्रत्येक शहरात राबविले पाहिजेत.

**खासदार श्रीरंग बारणे :** प्रत्येक जण प्रत्येक वेळी आपल्या स्वतःच्या व्यासपीठावर आपले विचार व्यक्त करत असतो, परंतु दिशा ही संस्था याला अपवाद आहे. एकाच व्यासपीठावर सर्वांना एकत्र आणून दिवाळीचा गोडवा अधिक वाढवण्याचा आणि राजकारणाच्या पलीकडे जाऊन पाहण्याचा दृष्टिकोन जपला पाहिजे, असा संदेश दिशा नेहमीच या कार्यक्रमाच्या निमित्ताने देत असते.

**आमदार आण्णा बनसोडे:** समाजकारण, राजकारण आणि प्रशासनातील व्यक्तींचे स्नेहबंध अधिक घट्ट करण्याचे काम या दिवाळी फराळाच्या निमित्ताने घडत आहे.

**शंकर जगताप :** दिवाळी फराळाच्या निमित्ताने आपली संस्कृती जतन करण्याची व वैचारिक मेजवानी देण्याची परंपरा दिशाने कायम राखली आहे.

**भाऊसाहेब भोईर :** पदे येतात आणि पदे जातात, परंतु पदाच्या पलीकडे जाऊन मित्रत्वाचे एक नाते असते, ते जपावे आणि अधिक वाढवावे असे काम राजकीय व्यक्तींना शिकवणारी, दिशा देणारी शहरातील ही एक अनोखी संस्था आहे.

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये "आयएसडीसी"ला चालना!

## » आमदार महेश लांडगे यांचा प्रकल्प : कुशल मनुष्यबळ निर्मितीला प्रोत्साहन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवडमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे कौशल्य विकास केंद्र अर्थात इंटरनॅशनल स्किल डेव्हलपमेंटर सेंटर उभारण्यात येणार आहे. त्यासाठी पायाभूत सुविधा सक्षम करण्याची भूमिका प्रशासनाने घेतली असून, सर्वसाधारण सभेत प्रस्तावित सेंटरच्या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली.**

महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे शहरात औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आणि आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास केंद्र उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी यासाठी पाठपुरावा सुरू केला असून, त्याला यश मिळाले आहे.

आमदार लांडगे यांनी पिंपरी-चिंचवड शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र (इंटरनॅशनल स्किल डेव्हलपमेंट सेंटर) विकसित करावे.

या करिता केंद्रीय कौशल्य आणि उद्योजकता धर्मेंद्र प्रधान यांची भेट घेतली होती. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाकडेही याबाबत पाठपुरावा सुरू केला होता. त्याला प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.




### चिंचवडमध्ये साकारणार 'आयएसडीसी'

» महापालिका सर्वसाधारण सभेमध्ये औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आणि कौशल्य विकास केंद्राच्या उभारणीसाठी चिंचवड येथील जुनी प्रीमियर कंपनीची २१ हजार १७२ चौरस मीटर जागा ताब्यात घेतली आहे. या ठिकाणी इमारत उभारण्यासाठी आयुक्त शेखर सिंह यांनी प्रशासकीय मान्यता दिली. त्यामुळे 'इंटरनॅशनल स्किल डेव्हलपमेंट सेंटर' च्या कामाला चालना मिळाली आहे.



" औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवडची ओळख 'एज्युकेशन हब' म्हणून व्हावी, असा आमचा संकल्प आहे. त्यामुळे जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, वायसीएम येथील वैद्यकीय महाविद्यालय आणि संशोधन केंद्राचे काम सुरू झाले. आता आगामी काळात आयआयएम, आंतरराष्ट्रीय दर्जाचे ग्रंथालय आणि कौशल्य विकास केंद्र उभारावे. यासाठी आम्ही पाठपुरावा करीत आहोत. महापालिका प्रशासनाने या केंद्राच्या उभारणीसाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यास सकारात्मक भूमिका घेतली. याबद्दल प्रशासनाचे आभार व्यक्त करतो. आता कौशल्य विकास केंद्रासाठी सल्लागार नियुक्ती करावी. तसेच, निविदा प्रक्रिया राबवून दोन-तीन महिन्यांत कामाला सुरूवात करावी, अशी अपेक्षा आहे.

**- महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा पिंपरी-चिंचवड.




**गेल्या दोन महिन्यांमध्ये क्रीडा क्षेत्रातील घडामोडी भारतासाठी खूप महत्त्वाच्या ठरल्या, क्रिकेट सोडून. विश्वचषक सुरूच आहे, तेव्हा त्याविषयी जरा नंतर. हांगझो आशियाई स्पर्धामध्ये भारताने प्रथमच शतकपार मजल मारली. त्यानंतर काही दिवसांनी भारतीय खेळाडूंनी पॅरा आशियाई स्पर्धामध्येही अभूतपूर्व कामगिरी करून दाखवली आणि येथेही पदकांचे शतक पार केले.**

# खेलो इंडिया.. ऑलिम्पिक राहू द्या!



दोन्ही हात नसतानाही तिरंदाजीमध्ये सुवर्णपदक जिंकलेली शीतल देवी संपूर्ण देशाच्या कौतुकाचा विषय ठरली. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे, प्रत्येक वेळी एखादीने किंवा एखाद्याने पदक जिंकल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ‘एक्स’वरून तिचे अभिनंदन आवर्जून करत होते. गेली काही वर्षे ते तसे करत आहेत.

अनेक खेळाडू हे निम्न आर्थिक स्तरातून येतात. त्यांच्या पालकांनी प्रचंड कष्ट उपसून आपल्या मुलांना या स्तरापर्यंत आणलेले असते. प्रशिक्षकांनी अनेक अडथळे ओलांडून शिष्यांना स्पर्धेसाठी सिद्ध केलेले असते. अशा वेळी कौतुकाची थाप पंतप्रधानांकडून मिळणे हे उत्साह दुणावणारेच ठरते. केवळ समाजमाध्यमांवर संदेश प्रसृत करून पंतप्रधान थांबत नाहीत. गेली दोन वर्षे ते ऑलिम्पिक, एशियाड, पॅरा स्पर्धेतील सहभागींना समक्ष भेटतात. हेतू हा की केवळ पदकविजेत्यांचेच गुणगान केले असे बाकीच्यांना वाटू नये. कारण जीव ओतून खेळणारे बाकीचेही असतात, त्या सगळय़ांच्याच श्रमाची परिणती पदकांमध्ये होत नसते. अशांसाठी पंतप्रधानांकडून मिळणारी शाबासकीची आणि उत्तेजनार्थ थाप मोलाचीच ठरते. गेल्या महिन्यात आणखी एका घटनेने क्रीडारसिकांचे लक्ष वेधून घेतले. ती घटना होती आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या बैठकीची. ऑलिम्पिक समितीचे सत्र बऱ्याच अवधीनंतर भारतात झाले. मुंबईतील या सत्रादरम्यान, ऑलिम्पिक २०३६ च्या यजमानपदाची इच्छा पंतप्रधान मोदी यांनी भारतीयांच्या वतीने अधिकृतपणे प्रकट केली. याला भारताची ऑलिम्पिकसाठी दावेदारी असे संबोधले गेले. ही वस्तुत: दावेदारी ठरत नाही. त्याची प्रक्रिया अधिक दीर्घ आणि किचकट असते. तरीदेखील पंतप्रधानांनीच खुद्द जाहीर केल्यामुळे ही प्रक्रिया येथून आणखी पुढे सरकेल असे मानायला जागा आहे. या घटनांतून एक बाब ठळकपणे दिसून येते. ती म्हणजे, क्रीडा क्षेत्रातील कामगिरीकडे सरकारचे बारीक लक्ष आहे. या क्षेत्रात केवळ आर्थिक नव्हे, तर भावनिक गुंतवणूक करण्याची सरकारची तयारी आहे. पण क्रीडा क्षेत्र हे सरकारने अशा प्रकारे स्वत:ला झोकून देण्यासाठी आदर्श क्षेत्र आहे का, असा प्रश्न यातून उपस्थित होतो. या प्रश्नाची उत्तरे सोपी नाहीत आणि पुरेशी आश्वासकही नाहीत. निव्वळ प्रतीकात्मकतेपलीकडे जाऊन या घडामोडींचा अभ्यास करावा लागेल. सर्वप्रथम ऑलिम्पिक यजमानपदाविषयी. २०३६ मध्ये ऑलिम्पिक भरवण्यासाठी सध्या अधिकृतरीत्या पाच देश स्पर्धेत आहेत – भारत, मेक्सिको, तुर्कीये, पोलंड आणि इंडोनेशिया. यांतील केवळ मेक्सिकोलाच ही स्पर्धा भरवण्याचा पूर्वानुभव आहे. १९६८ मध्ये ते या स्पर्धेचे यजमान होते. यंदाचे चार संभाव्य यजमान आणि भारत यांच्यातील महत्त्वाचा फरक म्हणजे, बाकिच्यांनी यजमान शहरेही निश्चित केली आहेत. आपण अजून त्या दिशेला वळलेलो नाही. पण हे शहर बहुधा अहमदाबादच असेल, असे मानायला जागा आहे. खरे तर ऑलिम्पिक स्पर्धेचा वाढलेला पसारा आणि यासाठी होणारा अवाढव्य खर्च पाहता, एकापेक्षा अधिक शहरांमध्ये स्पर्धेचे आयोजन व्हावे असा एक मतप्रवाह आहे. काही विश्लेषकांच्या मते भविष्यात एकापेक्षा अधिक देशांनाच ही स्पर्धा भरवणे आर्थिकदृष्टय़ा परवडू शकेल. याचे कारण ही स्पर्धा बहुतेकदा तोटय़ातच ढकलणारी ठरते. एका अभ्यासानुसार, मॉँट्रियल १९७६ ऑलिम्पिकपासून प्रत्येक स्पर्धेचा खर्च सरासरी १०० ते २०० टक्क्यांनी वाढलेला दिसतो. मॉँट्रियलसाठी लागलेल्या कर्जाची परतफेड तीन दशकांनी झाली. लंडनमध्ये २०१२ मध्ये झालेले ऑलिम्पिक प्रचंड तोटय़ाचे ठरले. टोक्योमध्ये २०२० ऑलिम्पिकच्या काळात ‘उधळपट्टीविरोधी’ मोर्चे निघाले. लंडनमध्ये येत्या काही वर्षांत पुन्हा ऑलिम्पिक भरवले जाणार नाही, या ठाम निष्कर्षाप्रत तेथील सरकार आणि कॉर्पोरेट विश्व आले.

## संपादकीय »

# दिवाळीची हवा!

***महाराष्ट्राने कालौघात दिवाळीच्या परंपरा जपतानाच बदलत्या जीवनशैलीप्रमाणे सुयोग्य बदल केले, पण आता या बदलांचा सांधा निसर्गचक्राशीही जुळावा..***

‘पावसाळय़ानंतरचा ऑक्टोबरच्या उन्हाचा तडाखा हळूहळू विरत जातो तसतशी दिवाळीची चाहूल लागते. घरातल्या कढयांमध्ये उकळणाऱ्या तेलामध्ये करंज्या आणि चकल्या तळायला सुरुवात होते आणि हवेतल्या गारव्याने ऋतुबदलाची घंटा किणकिणायला सुरुवात करतो. हवा बदलते, वातावरणातही आल्हाद येतो आणि पावसाळय़ात बदललेले सृष्टीचे सारे रंग नव्याने खुलून येतात.’ – गेली कित्येक शतके हे ऋतुचक्र असेच सुरू असतानाही माणसांना प्रत्येक ऋतूमध्ये दरवर्षी बदल होत असल्याची जाणीव मात्र होतच राहाते. हे सारे निसर्गनियमाने घडत असले, तरी त्यात काळाच्या विशिष्ट टप्प्यांवर बदल तर होत नसतील, अशी शंकाही मनाला चाटून जातेच. ‘नेमेचि येतो मग पावसाळा, हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा’ ही शाळेतल्या पाठय़पुस्तकातील कविता पाठ केली तरी दरवर्षी ७ जूनला येणारा पाऊस कितीही वाट पाहिली तरी जुलैपर्यंत येतच नाही.

**अमेरिकेत ओहायो आणि केंटकी या राज्यांमध्ये गर्भपाताच्या मुद्दय़ावरून डेमोक्रॅट्नी मारलेल्या बाजीमुळे पुढील वर्षी म्हणजे २०२४ च्या तेथील निवडणुकांमध्ये प्रचारात गर्भपाताचा हक्क हा मुद्दा महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे. वास्तविक गेल्या वर्षी म्हणजे जून २०२२ मध्ये तेथील सर्वोच्च न्यायालयाने ५० वर्षांपूर्वी, या खटल्यातील गर्भपाताचा हक्क देणारा निकाल बदलला आणि अमेरिकी स्त्रियांना गर्भपाताचा अधिकार नाकारला गेला.**

# मूलभूत हक्काच्या बाजूने कौल




या खटल्यामुळे अमेरिकेतील राज्यांना नागरिकांना गर्भपाताचा हक्क द्यायचा की त्यावर बंदी घालायची याबाबत आपापले कायदे करण्याची मुभा मिळाली. त्यानुसार ताबडतोब २०२२ मध्ये १४ राज्यांनी गर्भपातावर बंदी घातली आणि सहा राज्यांनी त्यासंबंधीचे होते ते कायदे अधिक कडक केले. तेव्हापासून गर्भपात या मुद्दय़ावरून अमेरिकेत सातत्याने वादंग सुरू आहे. आताही तीन राज्यांमधल्या वेगवेगळय़ा पातळय़ांवरच्या तीन निवडणुकांमध्ये गर्भपाताच्या हक्कांना मान्यता देणारे डेमोक्रॅट्स विजयी झाल्यामुळे या मुद्दय़ावर जनमताचे पारडे फिरल्याचे मानले जात आहे. ओहायो या राज्याने २०२० मध्ये डोनाल्ड ट्रम्प यांच्या बाजूने कौल दिला होता. पण त्याच राज्याने ७ नोव्हेंबर रोजी, गर्भपाताचा हक्क देणाऱ्या घटनादुरुस्तीच्या बाजूने मतदान केले आहे. तिथे एकूण ९३ टक्के मतांची मोजणी झाली आणि ५५.८ मतदारांनी गर्भपाताचा अधिकार असायला हवा हे मान्य केले आहे. हे थेट सार्वमत होते. पण अमेरिकेच्या काही राज्यांत मध्यावधी निवडणुकांत गर्भपात- हक्काच्या बाजूने प्रचार करणाऱ्या पक्षांना मिळालेला कौल हाही आश्वासक आहे. व्हर्जिनियामध्ये डेमोक्रॅट्सनी दोन्ही सभागृहांमध्ये विजय मिळवला आहे. तिथे रिपब्लिकन पक्षाचे गव्हर्नर ग्लेन योंगकिन यांनी त्यांच्या पक्षाच्या उमेदवारांसाठी जोरदार प्रचार केला होता आणि १५ आठवडय़ांनंतर गर्भपातावर बंदी असेल, अशी ठाम भूमिका मांडली होती. तर केंटकीमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाचे अ‍ॅण्डी बेशर दुसऱ्यांदा गव्हर्नरपदी निवडून आले. त्यांनी केंटकीचे अ‍ॅटर्नी जनरल डॅनियल कॅमरॉन यांचा पराभव केला. बेशर यांनी त्यांच्या प्रचारसभांमध्ये गर्भपाताच्या हक्काच्या बाजूने निर्विवाद भूमिका घेतली होती. २०२० मध्ये ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाकडेच कल असलेल्या या राज्याने या वेळी डेमोक्रॅट्सना दिलेला कौल हे जणू गर्भपाताच्या मुद्दय़ावरचे सार्वमत असल्याचे मानले जात आहे. हे तिन्ही विजय निवडणुकीच्या रिंगणात मागे पडत असलेल्या अध्यक्ष बायडेन यांच्यासाठीदेखील महत्त्वाचे आहेत. गाझासंदर्भातील भूमिकेमुळे बायडेन यांच्यावर टीका होत असताना पुढील वर्षी होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे निकाल बायडेन व त्यांच्या पक्षाला तारण्यासाठी विशेष महत्त्वाचे मानले जातात. गेल्या वर्षीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर गर्भपाताच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या वेगवेगळय़ा गटांनी वेगवेगळय़ा पातळय़ांवर, वेगवेगळय़ा प्रचारांमध्ये हा मुद्दा लावून धरला होता. साहजिकच गर्भपातविरोधी गटांनीही आपली बाजू ठामपणे मांडली होती.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कोकण किनारपट्टीवरील प्रदूषण धोकादायक पातळीवर!

## » रसायनांमुळे सागरी आणि मानवी आरोग्य धोक्यात

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याला लाभलेली ७२० किलोमीटरची कोकण किनारपट्टी प्रदूषणामुळे धोकादायक पातळीवर पोहोचल्याचे संशोधनातून समोर आले आहे. किनारपट्टी प्रदूषित करणाऱ्या घटकांमध्ये सूक्ष्म प्लॅस्टिक, औषधांतील रासायनिक घटकांचा समावेश असून, या प्रदूषणामुळे सागरी जीवन आणि मानवी आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.**



प्राग येथील चेक युनिव्हर्सिटी ऑफ लाइफ सायन्सेस आणि मुंबईतील महाराष्ट्र महाविद्यालय यांनी राज्याच्या पश्चिम किनारपट्टीवरील प्रदूषणाबाबत संशोधन केले. या संशोधनाबाबतचा शोधनिबंध 'सायन्स ऑफ द टोटल एन्व्हायर्न्मेंट' या संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध झाला. प्रदीप कुमकर, चांदनी वर्मा, प्रा. लुकाश कालोस, डॉ. सचिन गोसावी यांच्या मार्गदर्शनाखालील संशोधकांच्या चमूमध्ये स्टेफान हायसेक, मनोज पिसे, सोनिया झाल्टोवस्का, फिलिप मर्कल, मातेय बोझिक, लुकास प्रौस, कतरिना हँकोव्हा, राडेक रिन, पावेल कलौचक, मिस्लोव पेट्रटिल यांचा समावेश होता.

संशोधनासाठी मुंबई ते वेंगुर्ला या भागातील किनारपट्टीची दक्षिण, मध्य आणि उत्तर अशी विभागणी करून त्यातील १७ ठिकाणी सखोल अभ्यास करण्यात आला. त्यात औद्योगिक ठिकाणे, मासेमारी बंदरे, लोकप्रिय पर्यटनस्थळे यांचा समावेश होता. या १७ पैकी १५ ठिकाणी सूक्ष्म प्लॅस्टिकचे अस्तित्व आढळून आले.

> "या संशोधनात मासे, शैवाल, कोळंबी, खेकडे यांची तपासणी करून पर्यावरणाला निर्माण होणारा धोकाही अभ्यासण्यात आला. त्यात ७० टक्क्यांहून अधिक ठिकाणांना उच्च ते मध्यम पर्यावरणीय धोका असल्याचे आढळले. ही बाब गंभीर आहे. प्रदूषण रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना हाती घेण्याची आवश्यकता आहे.
>
> – **प्रदीप कुमकर,** संशोधक-मार्गदर्शक

> "संशोधनातून समोर आलेले निष्कर्ष चिंताजनक आहेत. किनारपट्टीवरील प्रदूषण रोखून स्थानिक पर्यावरणीय परिसंस्था, मानवी आरोग्याची हानी रोखण्याची गरज आहे. त्याशिवाय शाश्वत विकास साध्य करतानाच व्यापक जनजागृती आवश्यक आहे.
>
> – **प्रा. लुकाश कालोस,** संशोधकमार्गदर्शक

त्यात उत्तर कोकण किनारपट्टी सूक्ष्म प्लॅस्टिकमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषित असल्याचे दिसून आले. या सूक्ष्म प्लॅस्टिक धोकादायक घटकांचे वाहक असल्याने पर्यावरणीय, तसेच आरोग्याचे प्रश्न निर्माण होऊ शकतात.

त्याशिवाय मेटोप्रोलोल, ट्रामाडोल, वेन्लाफॅक्सिन, ट्रायक्लोसन, बिस्फोनेल ए, बिस्फोनेल एस असे रासायनिक घटक किनारपट्टीवरील पाण्यात आढळून आले. हे रासायनिक घटक औषधे, तसेच दैनंदिन वापरातल्या वस्तूंमध्ये असतात. उच्च रक्तदाबावरील उपचारांमध्ये मेटोप्रोलोल, वेदनाशामक औषधांमध्ये ट्रामाडोल, तर मानसोपचारातील औषधांमध्ये वेलानफॅक्सिन हा घटक वापरला जातो. या रासायनिक घटकांमुळे सागरी जीवन, मानवी आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, असे संशोधकांचे म्हणणे आहे.

# चोरांनी मधमाशांच्या पोळ्यावर दगड मारलाय!

## » सत्तेचा माज आलेल्यांनी बुलडोझरने शिवसेनेची शाखा पाडली

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंब्रा येथील शाखेची शिवसेना ( ठाकरे गट ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पाहणी केली. उद्धव ठाकरेंना शाखेजवळ जाण्यापासून पोलिसांनी रोखलं. यावेळी ठाकरे गटाचे नेते आणि पोलिसांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. त्यामुळे काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. यानंतर उद्धव ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना शिंदे गट आणि पोलिसांचा समाचार घेतला आहे.**

उद्धव ठाकरे म्हणाले, "पोलिसांचं धन्यवाद मानतो. कारण, त्यांनी शाखाचोरांचं रक्षण केलं. प्रशासन हतबल झाल्याचं संपूर्ण महाराष्ट्र पाहत आहे. आज येथे काही घडलं असतं, तर महाराष्ट्राची अब्रू गेली असती. सत्तेची गादी भोगणाऱ्यांनी आधीच महाराष्ट्राची अब्रू घालवली आहे." सत्तेचा माज आलेल्यांनी बुलडोझरने शिवसेनेची शाखा पाडली. पण, खरा बुलडोझर घेऊन मी मुंब्र्यातील रस्त्यावर आलो आहे. आपली बॅनर फाडल्याचं मला कळलं. मात्र, निवडणुका येऊद्या तुमची मस्ती फाडतो," असा इशारा उद्धव ठाकरेंनी



शिंदे गटाला दिला आहे. "खोके सरकारनं आमची शाखा पाडून एक खोका अडकवून ठेवला आहे. आमच्या जागेवर अतिक्रमण केलं आहे. तो खोका लवकरात लवकर उचलावा.

अन्यथा आम्ही येऊन तो खोका उचलून फेकून देईल. तुमच्यात हिंमत असेल, तर पोलिसांना बाजूला सारून समोर या," असं आव्हान उद्धव ठाकरेंनी शिंदे गटाला दिलं आहे. "लोकसभा निवडणुकीत गद्दाराची अनामत रक्कम जप्त करून घरी पाठवा," असं म्हणत उद्धव ठाकरेंनी श्रीकांत शिंदेंना लक्ष्य केलं. "या नेभळटांना कुणीही थारा द्यायचा नाही. प्रशासन चोरांचे गुलाम नाही. पोलिसांनी चोरांचं रक्षण केलं आहे. पण, चोरांनी मधमाशांच्या पोळ्यावर दगड मारला आहे. आता मधमाशा कुठे-कुठे डसतील पाहा," असा हल्लाबोलही उद्धव ठाकरेंनी शिंदे गटावर केला आहे. मुंब्र्यातील शिवसेना शाखेवरून ठाकरे गट आणि शिंदे गट आमने-सामने आले आहेत. शिंदे गटाने मुंब्र्यातील शाखा पाडल्यानंतर त्याठिकाणी तात्पुरती नवीन कंटेनर शाखा उभारली आहे. ते हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत घटनास्थळी दाखल झाले होते.

### हिंमत असेल तर पोलीस बाजुला ठेवा

» "अरे नेभळटांनो तुमच्यात हिंमत असेल तर पोलीस बाजुला ठेवा आणि समोर या... दिल्लीच्या कृपेनं आज तुम्ही सत्तेत बसला आहात. कठपुतली आणि बाहुल्यांनो.. तुमच्यात हिंमत नाही. मर्दाची औलाद असाल तर पोलीस बाजुला ठेवा आणि आम्हाला भिडा. आमची तयारी आहे. तुमच्या सगळ्यांच्या सोबतीने मी तिकडे जाऊन उभा राहिलो. बघू कुणाच्यात किती हिंमत आहे. माझ्या केसाला जरी धक्का लागला तरी यांचे (शिंदे गट) सगळे केस तमाम महाराष्ट्र उपटून टाकल्याशिवाय राहणार नाही," असंही उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

# जगाच्या तुलनेत भारतातील तापमान तीन पटीने वाढले!

## 12 शहरांमध्ये 100 दिवस सामान्यपेक्षा जास्त तापमान

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नोव्हेंबर 2022 ते ऑक्टोबर 2023 हा प्रत्येक महिना इतिहासातील सर्वात उष्ण महिना ठरला आहे. हे 12 महिने जगभरातील पूर्व-औद्योगिक पातळीपेक्षा 1.3 अंश सेल्सिअस जास्त उबदार होते, म्हणजेच 1890-1900 चे सरासरी तापमान. क्लायमेट सेंट्रल नावाच्या एका आंतरराष्ट्रीय संस्थेने आपल्या हवामान विशेषता विश्लेषणात ही माहिती दिली आहे.**

या अभ्यासानुसार, जगातील 170 देशांचे सरासरी तापमान वाढले आहे, ज्यामुळे 780 कोटी लोकांना (99%) सरासरीपेक्षा जास्त उष्ण वातावरणात राहावे लागले. आइसलँडसारख्या भागात वर्षभराचे सरासरी तापमान सामान्यपेक्षा कमी नोंदवले गेले. ज्या देशांमध्ये हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम दिसून आला त्या देशांमध्ये भारताचा समावेश करण्यात आला.



जगातील तापमानापेक्षा भारतातील तापमान तीन पटीने वाढले आहे. वेदर ॲट्रिब्युशन स्टडीनुसार, गेल्या 12 महिन्यांत जगातील 570 कोटी लोकसंख्येला किमान 30 दिवस सरासरीपेक्षा जास्त तापमानात राहण्यास भाग पाडले गेले. भारताच्या 120 कोटी लोकसंख्येला (86%) 30 दिवस उच्च तापमानात घालवावे लागले. पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि राजस्थान वगळता सर्व राज्यांमध्ये मागील 12 महिने सर्वात उष्ण होते. चीनमधील 51.3 कोटी (35%) आणि अमेरिकेतील 8.8 कोटी (26%) लोकांनाही सामान्य तापमानापेक्षा जास्त तापमानात राहावे लागले. जपान, इंडोनेशिया, फिलीपिन्स, व्हिएतनाम, बांगलादेश, इराण, इजिप्त, नायजेरिया, इटली, फ्रान्स, स्पेन, यूके, ब्राझील, मेक्सिको आणि सर्व कॅरिबियन देशांच्या 100% लोकसंख्येने वर्षातील 30 दिवस सामान्य तापमानापेक्षा जास्त अनुभवले.

### 500 वर्षांची प्रतीक्षा संपली

» जगातील तापमानापेक्षा भारतातील तापमान तीन पटीने वाढले आहे. वेदर ॲट्रिब्युशन स्टडीनुसार, गेल्या 12 महिन्यांत जगातील 570 कोटी लोकसंख्येला किमान 30 दिवस सरासरीपेक्षा जास्त तापमानात राहण्यास भाग पाडले गेले. भारताच्या 120 कोटी लोकसंख्येला (86%) 30 दिवस उच्च तापमानात घालवावे लागले. पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि राजस्थान वगळता सर्व राज्यांमध्ये मागील 12 महिने सर्वात उष्ण होते. चीनमधील 51.3 कोटी (35%) आणि अमेरिकेतील 8.8 कोटी (26%) लोकांनाही सामान्य तापमानापेक्षा जास्त तापमानात राहावे लागले. क्लायमेट सेंट्रलचे उपाध्यक्ष (विज्ञान) डॉ अँड्र्यू पर्शिंग म्हणाले की, एल निनोमुळे निर्माण झालेल्या उष्णतेमुळे 2024 मध्ये परिस्थिती आणखी वाईट होऊ शकते. हवामान बदलाच्या परिणामामुळे भारत, अमेरिका, युरोप आणि जपानमध्ये दीर्घकाळ अतिउष्णता येत आहे.

# 'अबंडन्स इन मिलेट्स' गाण्याला ग्रॅमीसाठी नामांकन

## गाण्यात दिसले मोदी, पीएम मोदींच्या कल्पनेवर बनवलेले गाणे

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**'अबंडन्स इन मिलेट्स' या गाण्याला सर्वोत्कृष्ट ग्लोबल म्युझिक परफॉर्मन्स श्रेणीमध्ये ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. या गाण्यात पीएम मोदी दिसणार आहेत. गायिका फाल्गुनी शाह आणि गौरव शाह यांनी ते गायलं आहे. गायिका फाल्गुनीच्या विनंतीवरून पंतप्रधान मोदींनी या गाण्यात भाषण दिले, जे त्यांनी स्वतः लिहिले आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित ग्रॅमी नामांकनात एखाद्या राजकारण्याला स्थान मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे.**




अबडन्स इन मिलेट्स हे गाणे १६ जून रोजी रिलीज झाले. फाल्गुनी म्हणाली होती की हे गाणे बाजरीचे आंतरराष्ट्रीय वर्ष साजरे करण्यासाठी तयार केले आहे. तसेच शेतकऱ्यांना बाजरी पिकवण्याचा संदेश देण्यात आला आहे, जेणेकरून जगातून भूक दूर होईल. खरं तर, संयुक्त राष्ट्रांनी 2023 हे बाजरीचे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले आहे. भारताने हा प्रस्ताव मांडला होता, त्याला संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत ७२ देशांनी पाठिंबा दिला होता. फाल्गुनी शाह म्हणजेच फालू यांना 2022 मध्ये ग्रॅमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 'अ कलरफुल वर्ल्ड'साठी सर्वोत्कृष्ट चिल्ड्रन म्युझिक अल्बम प्रकारात त्यांना हा पुरस्कार मिळाला. पुरस्कार मिळाल्यानंतर त्या दिल्लीत पंतप्रधानांना भेटण्यासाठी आल्या होत्या. जिथे खुद्द पंतप्रधानांनी बाजरीवर गाणे लिहिण्यास सांगितले होते. फाल्गुनी सांगते की, पीएम मोदींनी तिला सांगितले होते की, तू बाजरीवर गाणे लिहावेसे वाटते. तुम्ही जागतिक संगीतकार आहात. त्यामुळे छोट्या गावात बाजरी पिकवणाऱ्या शेतकऱ्यांपर्यंत हे गाणे पोहोचेल. कमी पाऊस असलेल्या भागात लहान शेतकऱ्यांना फायदा होईल. धान्य निर्यातही करता येईल, ज्यामुळे जगातील भूक निर्मूलन होण्यास मदत होईल. ग्रॅमी 2024 च्या नामांकन यादीत सात गाण्यांना 'बेस्ट ग्लोबल म्युझिक परफॉर्मन्स' श्रेणीत नामांकन मिळाले आहे. यामध्ये 'शॅडो फोर्स'साठी अरुज आफताब, विजय अय्यर आणि शेहजाद इस्माइली, 'अलोन'साठी बर्ना बॉय, 'फील'साठी डेव्हिडो, 'मिलाग्रो वाई डिझास्टर'साठी सिल्वाना एस्ट्राडा, बेला फ्लेक, एडगर मेयर आणि झाकीर हुसेन फूट. राकेश चौरसिया यांचा समावेश आहे.

### राष्ट्रांच्या आमसभेत 72 देशांनी पाठिंबा

» अबडन्स इन मिलेट्स हे गाणे १६ जून रोजी रिलीज झाले. फाल्गुनी म्हणाली होती की हे गाणे बाजरीचे आंतरराष्ट्रीय वर्ष साजरे करण्यासाठी तयार केले आहे. तसेच शेतकऱ्यांना बाजरी पिकवण्याचा संदेश देण्यात आला आहे, जेणेकरून जगातून भूक दूर होईल. खरं तर, संयुक्त राष्ट्रांनी 2023 हे बाजरीचे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून घोषित केले आहे. भारताने हा प्रस्ताव मांडला होता, त्याला संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत ७२ देशांनी पाठिंबा दिला होता. फाल्गुनी शाह म्हणजेच फालू यांना 2022 मध्ये ग्रॅमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. 'अ कलरफुल वर्ल्ड'साठी सर्वोत्कृष्ट चिल्ड्रन म्युझिक अल्बम प्रकारात त्यांना हा पुरस्कार मिळाला. पुरस्कार मिळाल्यानंतर त्या दिल्लीत पंतप्रधानांना भेटण्यासाठी आल्या होत्या. जिथे खुद्द पंतप्रधानांनी बाजरीवर गाणे लिहिण्यास सांगितले होते.

# 80-90 च्या दशकात माझ्या दोन बायका होत्या!



गोविंदा बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेता आहे. ८० आणि ९० च्या काळात गोविंदाने अनेक सुपरहिट चित्रपट दिले. अभिनेत्यासह गोविंदा एक चांगला डान्सरही आहे. सोशल मीडियावर गोविंदा नेहमी सक्रिय असतो. व्हिडीओ आणि फोटो शेअर करीत तो चाहत्यांच्या संपर्कात असतो. नुकताच गोविंदाने त्याच्याबद्दल एक मोठा खुलासा केला आहे. नुकताच गोविंदाने रमेश तौरानी यांच्या दिवाळी पार्टीत हजेरी लावली होती. या पार्टीत प्रसिद्ध दिग्दर्शक डेव्हिड धवनही सहभागी झाले होते. गोविंदाने आपल्या इन्स्टाग्रामवर डेव्हिड धवन यांच्याबरोबरचा एक फोटो शेअर केला आहे. गोविंदाने फोटो शेअर करीत लिहिले "८० आणि ९० च्या दशकात माझ्या दोन पत्नी होत्या. एक सुनीता आणि एक डेव्हिड" गोविंदाची ही पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. अनेक चाहत्यांनी या पोस्टवर कमेंट केली आहे. गोविंदा आणि डेव्हिड धवनच्या जोडीने अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. त्यामध्ये कुली नंबर १, हिरो नंबर १, शोला और शबनम, राजा बाबू, आँखे व पार्टनर यांसारख्या चित्रपटांचा समावेश आहे.

# करीनानं काढलेली रांगोळी पाहून सैफही चक्रावला

देशभरात दिवाळीचा (DIWALI 2023) सण उत्साहानं साजरा केला जात आहे. पणती लावून आणि रांगोळी काढून दिवाळी साजरी केला जाते. अनेक सेलिब्रिटी देखील सोशल मीडियाच्या माध्यमातून दिवाळीच्या शुभेच्छा देत आहेत. अशातच आता अभिनेत्री करीना कपूरनं (KAREENA KAPOOR) खास फोटो शेअर करुन चाहत्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.करीनानं शेअर केलेल्या या फोटोनं अनेकांचे लक्ष वेधले आहे. करिनानं शेअर केलेल्या फोटोमध्ये तैमूर आणि जेह हे दोघे रांगोळी काढताना दिसत आहेत.करीना देखील तिच्या मुलांना रांगोळी काढण्यासाठी मदत करताना दिसत आहे.करीनानं शेअर केलेल्या फोटोमधील सैफ अली खानच्या हावभावांनी अनेकांचे लक्ष वेधले आहे. तैमूर, जेह आणि करीनानं काढलेली रांगोळी पाहिल्यानंतर सैफ हा चक्रावला आहे, असं फोटोमध्ये दिसत आहे. करीनानं शेअर केलेल्या या फोटोवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव केला आहे. करीनानं तैमूर, जेह आणि सैफचा फोटो शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं, "अय्यो जेव्हा कुटुंबाला रांगोळी काढायची की होळी खेळायची हे...काही कळत नाही,पण महत्त्वाचे हे आहे की, आम्ही मजा केली. हा सण सर्वांच्या आयुष्यात प्रेम आणि हास्य आणेल करीनानं शेअर केलेल्या फोटोला एका नेटकऱ्यानं कमेंट केली, "ही दिवळी आहे की होळी?" तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "तैमूरने सगळ्यात चांगली रांगोळी काढली आहे त्याला बेस्ट रांगोळीचा पुरस्कार मिळायला हवा"



करीना ही लवकरच 'सिंघम 3' या चित्रपटामधून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात ती अवनी बाजीराव सिंघम ही भूमिका साकारणार आहे. काही दिवसांपूर्वी 'सिंघम 3' या चित्रपटामधीलकरीनाचा फर्स्ट लूक रिलीज करण्यात आला होता. या फोटोमध्ये करीनाच्या हातात बंदूक आणि चेहऱ्यावर धगधगती आग पाहायला मिळत आहे. प्रेक्षक करीनाच्या या चित्रपटाची उत्सुकतेने वाट बघत आहेत. काही दिवसांपूर्वी करीनाचा 'जाने जान' हा चित्रपट ओटीटीवर रिलीज झाला. आता करीनाच्या सिंघम-3 या आगामी चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.



# ओरी कोण ? तो काय करतो?

बॉलीवूड सेलिब्रिटींचा बेस्ट फ्रेंड आणि प्रत्येक पार्टीत त्यांच्याबरोबर दिसणारा ओरी सध्या चांगलाच चर्चेत आहे. ओरीचे पूर्ण नाव ओरहान अवत्रामणी आहे. ओरीचं सोशल मीडिया अकाउंट पाहिल्यास अगदी रेखापासून ते सलमान खान व आताच्या काळातील जान्हवी कपूर, सारा अली खान, सुहाना खान व निसा देवगण यांच्याबरोबर त्याचे फोटो आहेत. सारा अली खान आणि अनन्या पांडे यांनी नुकतीच 'कॉफी विथ करण'च्या आठव्या पर्वात हजेरी लावली. यावेळी ओरीबद्दल करणने या दोघींना प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी दिलेल्या उत्तराचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. हा व्हिडीओ एक्सवर शेअर करत उद्योजक अश्नीर ग्रोव्हरने दिलेलं कॅप्शन चर्चेत आहे. "हे पाहिल्यावर लोक देवाला म्हणतील, अगले जनम मोहे 'ओरी' (और ही) किजो" असं कॅप्शन अश्नीरने लिहिलं आहे. खरंतर व्हिडीओ दोन्ही अभिनेत्रींना ओरीच्या प्रोफेशनबद्दल काहीच माहिती नाही. एपिसोड दरम्यान, शोचा होस्ट करण जोहरने विचारलं "ओरी कोण आहे, तो काय करतो?" सारा म्हणाली, "ओरी? "ओरी कोण आहे हे कोणालाच माहित नाही?" अनन्याला म्हणाली की लोकांना ओरी आवडतो.



# टायगर वर्सेज पठाण बद्दल सलमान खानने केलं स्पष्ट!

बॉलिवूड अभिनेता सलमान खान आणि कतरिना कैफचा 'टायगर ३' उद्या म्हणजे १२ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या चित्रपटाची चर्चा सुरु आहे. 'टायगर' आणि 'टायगर जिंदा है' चित्रपटाप्रमाणेच टायगर ३ मध्येही प्रेक्षकांना सलमान आणि कतरिनाचा ॲक्शन लूक बघायला मिळणार आहे. 'टायगर ३' च्या ॲडव्हान्स बुकिंगला सुरुवात झाली. या चित्रपटाने ॲडव्हान्स बुकिंगच्या माध्यमातून मोठी कमाई केली आहे.

ॲडव्हान्स बुकिंगमधून चित्रपटाने १५ कोटी ५८ लाख रुपयांची कमाई केली आहे. ॲडव्हान्स बुकिंग पाहता पहिल्याच दिवशी हा चित्रपट मोठी कमाई करू शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. 'भारतात जवळपास ३५ कोटींची कमाई करू शकतो, तर जगभरात १०० कोटींचा व्यवसाय करण्याची शक्यता आहे. याबरोबरच 'यश राज फिल्म्स'च्या 'स्पाय युनिव्हर्स'मधील आगामी 'टायगर वि. पठाण'चीही जबरदस्त चर्चा आहे.

# मला देवाकडून मिळालेली सर्वात गोड भेट





बॉलीवूड अभिनेत्री परिणीती चोप्रा नेहमी चर्चेत असते. यावर्षी स्पटेंबरमध्ये परिणीतीने आपचे नेते राघव चड्डा यांच्याबरोबर लग्नगाठ बांधली. दोघांच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. आज राघव चड्डा यांचा ३५ वा वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त परिणीतीने खास पोस्ट शेअर करत राघव यांना शुभेच्छा दिल्या आहेत. परिणीतीने इन्स्टाग्रामवर राघव यांच्याबरोबर काही फोटो शेअर केले आहेत. फोटो शेअर करत तिने लिहिले की, "तू मला देवाकडून मिळालेली सर्वात गोड भेट आहेस. तुझं मन आणि बुद्धी मला आश्चर्यचकित करते. तुझी तत्त्वे, प्रामाणिकपणा आणि विश्वास मला एक चांगला माणूस बनण्याची प्रेरणा देतात. तुझी शांतता माझ्यासाठी औषधासारखी आहे. आज माझा सर्वोत्तम दिवस आहे कारण आज तुझा जन्म झाला. मला निवडल्याबद्दल धन्यवाद. पोस्टमध्ये परिणीतीनी राघव यांच्याबरोबरचे काही रोमँटिक फोटो शेअर केले आहेत.

# इंग्लंडकडून पाकिस्तानचा 93 धावांनी पराभव!

## पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी झाला पात्र

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पाकिस्तान आणि इंग्लंड या दोन्ही संघांचा विश्वचषक २०२३मधील प्रवास अखेर संपुष्टात आला. इंग्लंडने विजयासाठी ठेवलेले ३३८ धावांचे लक्ष्य ठेवले होते. पाकिस्तानला उपांत्य फेरी गाठण्यासाठी हा सामना ४० चेंडूत जिंकावा लागणार होता, जे की अशक्य काम होते. त्यांनी ६.४ षटकांत पार केले असते तर पाकिस्तान उपांत्य फेरीत पोहोचला असता. मात्र, बाबर आझमच्या संघाला पूर्ण षटकात देखील हा सामना जिंकता आला नाही. इंग्लंडने हा सामना ९३ धावांनी जिंकत २०२५ साली पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीत थेट पात्र झाले आहेत. उपांत्य फेरीत १५ नोव्हेंबरला भारत-न्यूझीलंड (मुंबई) आणि १६ नोव्हेंबरला ऑस्ट्रेलिया-दक्षिण आफ्रिका ( कोलकाता) अशा लढती होतील.**

एकदिवसीय विश्वचषकाच्या ४४व्या सामन्यात इंग्लंडने पाकिस्तानचा ९३ धावांनी पराभव केला. कोलकात्याच्या ईडन गार्डन्स मैदानावर इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ९ गडी गमावून ३३७ धावा केल्या. प्रत्युत्तरात पाकिस्तानचा संघ ४३.३ षटकांत २४४ धावांवर सर्वबाद झाला आणि सामना गमावला. डेव्हिड विलीला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. इंग्लंडने पाकिस्तानचा ९३ धावांनी पराभव केला आहे. या विजयासह इंग्लंडने पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आपले स्थान पक्के केले आहे. त्याचवेळी, २०२३च्या एकदिवसीय विश्वचषकातील पाकिस्तान आणि इंग्लंडचा प्रवास संपला आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिकेनंतर ऑस्ट्रेलिया आणि अखेर न्यूझीलंडने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. आता १५ नोव्हेंबरला मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पहिल्या उपांत्य फेरीत भारताचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे. त्याचवेळी, १६ नोव्हेंबरला दुसऱ्या




उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियन संघ कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर दक्षिण आफ्रिकेशी भिडणार आहे. या सामन्यात इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात ९ गडी गमावून ३३७ धावा केल्या. इंग्लंडकडून बेन स्टोक्सने ८४, जो रूटने ६० आणि जॉनी बेअरस्टोने ५९ धावा केल्या. डेव्हिड मलानने ३१, हॅरी ब्रूकने ३० आणि जोस बटलरने २७ धावा केल्या. पाकिस्तानकडून हारिस रौफने तीन विकेट्स घेतल्या. शाहीन आफ्रिदी आणि मोहम्मद वसीम ज्युनियर यांना प्रत्येकी दोन गडी बाद करण्यात यश मिळाले.

इफ्तिखार अहमदने एक विकेट घेत त्यांना मदत केली. ३३८ धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानने २४४ धावा केल्या. आघा सलमानने सर्वाधिक ५१ धावा केल्या. कर्णधार बाबरने ३८ तर रिझवानने ३६ धावा केल्या. शेवटी हारिस रौफने ३५ धावांचे योगदान दिले. इंग्लंडकडून डेव्हिड विलीने तीन विकेट्स घेतल्या. आदिल रशीद, गुस ॲटकिन्सन आणि मोईन अली यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. ख्रिस वोक्सने एक विकेट घेतली. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत आपल्या अंतिम साखळी सामन्यात इंग्लंडने पाकिस्तानचा 93 धावांनी पराभव केला आहे. या विजयासह इंग्लंडने पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आपले स्थान पक्के केले आहे. त्याचवेळी एकदिवसीय विश्वचषकातील पाकिस्तान आणि इंग्लंडचा प्रवास संपला आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिकेनंतर ऑस्ट्रेलिया आणि अखेर न्यूझीलंडने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. आता 15 नोव्हेंबरला मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पहिल्या उपांत्य फेरीत भारताचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे. तर, 16 नोव्हेंबरला दुसऱ्या उपांत्य फेरीचा सामना ऑस्ट्रेलिय आणि दक्षिण आफ्रिक यांच्यात होणार आहे. हा कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर खेळवण्यात होणार आहे. पाकिस्तानविरूद्धच्या सामन्यात इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना 50 षटकात 9 गडी गमावून 337 धावा केल्या. इंग्लंडकडून बेन स्टोक्सने 84, जो रूटने 60 आणि जॉनी बेअरस्टोने 59 धावा केल्या. डेव्हिड मलानने 31, हॅरी ब्रूकने 30 आणि जोस बटलरने 27 धावा केल्या. पाकिस्तानकडून हरिस रौफने तीन बळी घेतले. शाहीन आफ्रिदी आणि मोहम्मद वसीम ज्युनियर यांना प्रत्येकी दोन यश मिळाले. इफ्तिखार अहमदने एक विकेट घेतली. इंग्लंडने दिलेल्या 338 धावांचा पाठलाग करताना पाकिस्तानने 244 धावा केल्या. आघा सलमानने सर्वाधिक ५१ धावा केल्या. कर्णधार बाबरने 38 तर रिजिवानने 36 धावा केल्या.

### पाकिस्तान इंग्लंडचा प्रवास संपला

एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत आपल्या अंतिम साखळी सामन्यात इंग्लंडने पाकिस्तानचा 93 धावांनी पराभव केला आहे. या विजयासह इंग्लंडने पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आपले स्थान पक्के केले आहे. त्याचवेळी एकदिवसीय विश्वचषकातील पाकिस्तान आणि इंग्लंडचा प्रवास संपला आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिकेनंतर ऑस्ट्रेलिया आणि अखेर न्यूझीलंडने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. आता 15 नोव्हेंबरला मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पहिल्या उपांत्य फेरीत भारताचा सामना न्यूझीलंडशी होणार आहे. तर, 16 नोव्हेंबरला दुसऱ्या उपांत्य फेरीचा सामना ऑस्ट्रेलिय आणि दक्षिण आफ्रिक यांच्यात होणार आहे. हा कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर खेळवण्यात होणार आहे.

# नेदरलँडविरुद्धच्या भारतीय संघात तीन बदल शक्य!

## जसप्रीत बुमराह, के. एल. राहुल आणि रवींद्र जडेजा यांना विश्रांती

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आयसीसी विश्वचषक 2023 मधील शेवटचा साखळी सामना उद्या (रविवारी) भारत आणि नेदरलँड यांच्यात होणार आहे. हा सामना बंगळूरच्या चिन्नास्वामी क्रिकेट स्टेडियमवर होणार आहे. या सामन्यात भारताच्या जसप्रीत बुमराह, के. एल. राहुल आणि रवींद्र जडेजा यांना विश्रांती देऊन त्यांच्या जागी अनुक्रमे प्रसिद्ध कृष्णा, इशान किशन आणि रविचंद्रन अश्विन यांना संघात संधी मिळू शकते.**

भारताने याआधीच गुणतालिकेत अव्वल स्थानासह उपांत्य फेरी निश्चित केली आहे. अशा स्थितीत नेदरलँडस्विरुद्धच्या




सामन्यातील विजय किंवा पराभवाचा भारताच्या गुणतालिकेवर कोणताही परिणाम होणार नाही. पण या सामन्यात भारतीय संघाच्या प्लेईंग इलेव्हनमध्ये मोठा बदल पाहायला मिळू शकतो. या सामन्यातून तीन स्टार खेळाडूंना विश्रांती दिली जाऊ शकते. भारतासाठी उद्याचा हा सामना ही केवळ औपचारिकता आहे. भारत नेदरलँडविरूद्धच्या सामन्यानंतर उपांत्य फेरीत खेळणार आहे. या सामन्यात सर्व खेळाडूंनी तंदुरुस्त राहणे अत्यंत गरजेचे आहे. पण जर कोणास दुखापत झाली तर रोहित शर्माला त्याचा बॅकअप घ्यावा लागेल. त्यामुळे उद्याच्या सामन्यात कर्णधार रोहित शर्मा प्लेईंग इलेव्हनमध्ये 3 मोठे बदल करू शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे. सर्वप्रथम उत्कृष्ट फॉर्मात असलेला वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या जागी प्रसिद्ध कृष्णाला संधी दिली जाऊ शकते. फिरकी आणि फलंदाजीची जादू असलेला अष्टपैलू रवींद्र जडेजाच्या जागी रविचंद्रन अश्विनला संधी दिली जाऊ शकते. तिसरा बदल असेल तो म्हणजे उपकर्णधार के.एल. राहुलच्या जागी इशान किशनला संधी दिली जाऊ शकते. हे तिन्ही खेळाडू भारतीय संघासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. अशा परिस्थितीत त्यांना विश्रांती देऊन दुखापतीपासून त्यांना वाचवणे हे त्यांना वगळण्याचे मुख्य कारण आहे.या सामन्यातून तीन स्टार खेळाडूंना विश्रांती दिली जाऊ शकते. भारतासाठी उद्याचा हा सामना ही केवळ औपचारिकता आहे.

### इशान किशनला दिली जाऊ शकते संधी

नेदरलँडविरूद्धच्या सामन्यात सर्व खेळाडूंनी तंदुरुस्त राहणे अत्यंत गरजेचे आहे. पण जर कोणास दुखापत झाली तर रोहित शर्माला त्याचा बॅकअप घ्यावा लागेल. त्यामुळे उद्याच्या सामन्यात कर्णधार रोहित शर्मा प्लेईंग इलेव्हनमध्ये 3 मोठे बदल करू शकतो, अशी शक्यता वर्तवली जात आहे. सर्वप्रथम उत्कृष्ट फॉर्मात असलेला वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहच्या जागी प्रसिद्ध कृष्णाला संधी दिली जाऊ शकते. अष्टपैलू रवींद्र जडेजाच्या जागी रविचंद्रन अश्विनला संधी दिली जाऊ शकते. तिसरा बदल असेल तो म्हणजे उपकर्णधार के.एल. राहुलच्या जागी इशान किशनला संधी दिली जाऊ शकते.